# प्रकरण पहिले

## विषय-प्रवेश

# प्रकरण पहिले

# विषय-प्रवेश

## 1·1 विकासाचे राजकारण :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे· भारतीय शेतीचा विकास करण्यासाठी जलसंपत्तीचा विकास व वाटप करणे महत्त्वाचे आहे· पाणी शेतीला, पिण्यासाठी, उद्योगधंद्याना, वीज उत्पादनासाठी अत्यंत आवश्यक आहे· विकास प्रक्रियेत पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढत चालली आहे·[1] पाऊसही नियमितपणे होत नाही, पाऊस अनियमित होत असलेने दुष्काळी परिस्थिती आणि पाणी टंचाई या प्रश्नाने पश्चिम भारतात अनेक प्रदेशांना ग्रासले आहे· पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातील काही तालुके याच पध्दतीने ग्रासलेले आहेत·, आधुनिक काळात पर्यावरणातील समतोल बिघडवणा-या घटना या भागामध्ये घडताना दिसत आहेत· भारतातील आणि खास करून पश्चिम भारतातील ग्रामीण विकासाचा ज्यावेळी आपण विचार करतो, त्यावेळी या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीची दखल घ्यावी लागते·

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकास प्रक्रियेमध्ये अनेक योजना आखण्यात आल्या, अनेक योजनांची अंमलबजावणी केली· ग्रामीण भागामध्ये हरित क्रांतीमुळे विकासाचे नवे पर्व सुरू झाले· पण या विकास प्रक्रियेमध्ये काही भागांचाच विकास झाला आणि अनेक दुष्काळग्रस्त प्रदेश विकासापासून वंचित राहिले· त्यांच्याकडे ज्या प्रमाणात लक्ष देणे गरजेचे होते, तितके लक्ष देण्यात आले नाही· त्यामुळे ग्रामीण विकासाच्या एका पर्वानंतर फक्त विकासाची काही बेटेच तयार झालेली दिसतात·[2] पश्चिम महाराष्ट्राच्या सांगली जिल्हयाच्या बाबतीतही विकास प्रक्रियेत असेच घडले आहे·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विकास प्रक्रियेतून पुढे आलेल्या ग्रामीण नेतृत्वाने विकासाचा बराचसा फायदा आपल्या पदरात पाडून घेतला· ग्रामीण भागात त्याने अनेक नवीन संस्था निर्माण केल्या आणि त्याव्दारे ग्रामीण राजकारणावर आपली पक्कड घट्ट केली· केंद्र सरकार आणि राज्य सरकारला या ग्रामीण नेतृत्वाची गरज आपली राजकीय व्यवस्था सुस्थिर करण्यासाठी असलेने त्यांचाही पाठिंबा याच नेतृत्वाला मिळाला· खास करून 1960 नंतर प्रत्येक राज्यामध्ये असे ग्रामीण नेतृत्व कसे तयार होईल यासाठी प्रयत्न झाला· सहकारी संस्था, पंचायत राज्य आणि शिक्षण संस्था यांची निर्मिती व विस्तार करण्यामध्ये हे धोरण स्पष्ट दिसते·[3] महाराष्ट्रातही यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण नेतृत्वाची बांधणी झालेली आपल्याला दिसते·[4]

केंद्र सरकारच्या विकास धोरणानुसार या ग्रामीण नेतृत्वाच्या बरोबर एक नवा सधन वर्ग ग्रामीण भागामध्ये तयार झाला· आपले हितसंबंध धोक्यात येणार नाहीत· याची खबरदारी त्याने विकासनीती तयार होत असताना घेतली· त्यामुळे विकासापासून मोठी जनसंख्या आणि प्रदेश वंचित राहिला· खास करून कमी पावसाचा प्रदेश विकास प्रक्रियेतून बाजूला राहिला· विकसित भागातील सधन नेतृत्वावर त्याला अवलंबून रहावे लागले म्हणजेच त्याने सतत आपल्यावर अवलंबून रहावे, अशी विकासाची चौकट तयार करण्यात आली·[5] सर्व राजकीय पक्षांना विकसित भागातील सधन नेतृत्वाची मदत आवश्यक असलेने त्यांच्याविरोधी उठाव पक्षात झाला नाही· याउलट पाण्याची चणचण असताना अविकसित भागात साखर कारखाने मंजूर करण्यात आले· सत्ता स्पर्धेसाठी या पध्दतीचे विकासाचे तुकडे या भागातील जनतेपुढे फेकण्यात आले· पाण्याची अडचण असताना जास्त पाणी लागणारे ऊसासारखे पीक घेण्याचे प्रयोजन करण्यात आले· ऊस, साखर कारखाने आणि इतर सहकारी संस्थांची बांधणी ही आपल्या स्थानाला व धोरणाला धक्का लागू नये म्हणून करण्यात आली· त्यातून विकासाचे अनेक प्रश्न निर्माण झाले·

पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि खास करून सांगली जिल्हयामध्ये या विकास राजकारणातून भक्कम नेतृत्व तयार झाले· मा·वसंतदादा पाटील, राजाराम बापू पाटील यांनी सहकारी साखर कारखाने आणि इतर संस्थांव्दारे संपूर्ण जिल्हाभर कार्यकर्त्यांचे जाळे तयार केले· विकासाची दिशा त्यांनी ठरविली होती की ज्यामध्ये साखर कारखाने आणि

इतर सहकारी संस्था यांचा समावेश होता· राज्यपातळीवर व देशपातळीवर त्यांनी कॉंग्रेस नेतृत्वाला पाठिंबा देवून आणि त्यांचा आधार घेवून आपल्या नेतृत्वाची बांधणी केली·[6] परंतु या नेतृत्वानेही जिल्हयातील अवर्षण प्रवण तालुक्यांच्या विकासासाठी योग्य प्रमाणात कार्य केल्याचे दिसत नाही· त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात 40 वर्षानंतरही जिल्हयाचा बराचसा भाग विकासापासून वंचित राहिला· शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उलट या भागात तीव्र झाला· या विकास प्रक्रियेतून निर्माण झालेल्या असंतोषाचा भाग म्हणजे अनेक आंदोलने या भागात आतापर्यंत झाली· या सर्व प्रस्थापित धोरणाविरूध्द काही गट प्रयत्न करू लागले·

स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये या जिल्हयातील लोकांनी दिलेला तीव्र लढा आणि प्रतिसरकारचा केलेला प्रयत्न लक्षात घेता सामाजिक व राजकीय पातळीवर विकसित नेतृत्व येथे तयार झाले होते·[7] जनसमुदायही राजकीयदृष्टया परिपक्व झालेला दिसतो· या पार्श्वभूमीवरच अविकसित खानापूर तालुक्यातील जनतेने प्रस्थापित विकासाच्या विषम धोरणाविरूध्द आंदोलने सुरू केली आणि या आंदोलनाच्या पर्वातून "बळीराजा स्मृती धरण" आंदोलन सुरू झाले· दुष्काळ निर्मूलनाचा नवा मार्ग, विकासासंबंधी एक नवी मांडणी म्हणून ही कल्पना पुढे आली आहे· पर्यावरणाच्या चाललेल्या विध्वसांला आपण आवर घालू शकतो असे मत "बळीराजा स्मृती धरण" आंदोलक मांडू लागले· शासनानेही बळीराजा स्मृती धरणाला मान्यता दिली व लोकांनी स्वबळाने हे धरण बांधून पूर्ण केले· विकासाचा नवा प्रस्ताव या निमित्ताने पुढे आला·

## 1·2 विषयाचे महत्त्व :-

स्वातंत्र्योत्तर काळात देशात शासनाने अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या· सामुदायिक विकास योजनेची सुरूवात 1952 साली झाली· ग्रामीण भागातील लोकांचा विकास घडवून आणण्यासाठी शेती, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास या विविध क्षेत्रात विकासाचे कार्यक्रम सुरू करण्यात आले· नव्या भारताची उभारणी ग्रामीण भागातून झाली पाहिजे आणि ग्रामीण विकासात शेती विकासाचे स्थान महत्त्वाचे आहे· यातूनच हरित क्रांतीचे पर्व देशात सुरू झाले· शेती विकासासाठी पाणी व वीज या दोन गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत· यासाठी शासनाने शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या

दृष्टीने अनेक नद्यांवर धरणे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला· यामध्ये वीज निर्मितीचाही उद्देश होता· या योजनांचा आपणास फायदा मिळाला पाहिजे यासाठी आपल्या गावात, आपल्या गावाजवळच्या नदीवर धरण बांधले जावे, आपल्याला वीज मिळावी यासाठी लोकांनी संघर्ष करण्यास सुरुवात केली· यात बडे भांडवलदार, मोठे जमीनदार, प्रस्थापित राजकीय मंडळी यशस्वी झाली· ग्रामीण भागाचा योग्य विकास व्हावयाचा असेल तर त्या विकास कार्यक्रमात लोकांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे हे तत्वच प्रस्थापित मंडळींनी मोडीत काढले·

शेतीच्या विकासासाठी अनेक जलसिंचन योजना अंमलात आणल्या· त्यासाठी मोठमोठी धरणे बांधली· महाराष्ट्रात कोयना, जायकवडी, धोम, काळम्मावाडी, चांदोली सारखे प्रकल्प राबविण्यात आले· परंतु हे शासनाचे विकास कार्य सतत दुष्काळात होरपळत असणा-या अवर्षण प्रवण भागापर्यंत पोहोचलेच नाही·

जल संपत्तीचा फायदा काही प्रदेशातील मूठभर मंडळीनाच झाला· महाराष्ट्रातील बहुतांशी जनता आजसुध्दा पाण्यापासून वंचित आहे· या विषम परिस्थितीला कंटाळूनच पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हयातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूरांनी स्वतःच विकासाचा कार्यक्रम हाती घेतला· स्वतःच्या भागातील दुष्काळ स्वतःच घालविण्यासाठी नियोजन केले· याचा पहिला प्रयोग म्हणून बळीराजा धरण बांधले· एवढेच नव्हे तर या धरण निर्मितीतून देशाला सामुदायिक विकास योजनेचा एक नवा प्रस्ताव दिला·

बळीराजा धरणाचा प्रयोग प्रस्थापित शासकीय यंत्रणेच्या चौकटीत बसणारा नव्हता· आजही तो बसणार नाही· वास्तविक धरण बांधण्याची जबाबदारी शासनाची आहे· परंतु शासनच आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करते तेव्हा बलवडी-तांदुळवाडी सारख्या खेडयातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूरानी एकत्रित येवून विद्यार्थी बुध्दिवंत, कार्यकर्ते व पत्रकारांच्या सहकार्यातून वैयक्तिक जबाबदारीवर धरण बांधून तयार केले· एवढेच नव्हे तर पर्यावरण संरक्षणासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचाच वापर व तोही गरजेपुरताच हे सूत्र बळीराजाने पुढे आणले· वाळूची लूट थांबविणे, पाणी अडवून ते समान पध्दतीने देणे, या पाण्यावर केवळ पैशाची नव्हे तर कडधान्ये, धान्ये आणि वनशेतीही करणे, अशा शास्त्रोक्त पायावरील बळीराजाचा प्रयोग शासनाच्या प्रशासकीय

चौकटीला हादरा देणारा होता म्हणून त्याला शासकीय पातळीवर जोरदार विरोध झाला· मात्र मुक्ती संघर्ष चळवळीच्या कार्यकर्त्यांनी धरण जिद्दीने उभे केले· शासनाबाबत त्यांची भूमिका "आला तर तुमच्यासह, न आला तर तुमच्याशिवाय" अशी होती· ब-याच अंशी त्यांना लढे देत-देत आपली भूमिकेतील उत्तरार्धच पार पाडावा लागला· लोकलढयाने काय साध्य होऊ शकते हे त्यांनी बळीराजा प्रयोगाने दाखवून दिले· हे धरण केवढया आकाराचे आहे यापेक्षा या धरणासाठी कष्टक-यांनी केवढा मोठा संघर्ष उभा केला, व आपले धोरण यशस्वी केले हे अत्यंत महत्त्वाचे आहे·

कष्टकरी जनतेने कमी वेळात, कमी खर्चात तसेच तांत्रिकदृष्टया परिपूर्ण असे स्वबळावर हे धरण बांधून लोकांनीच नवी पर्यायी विकासनीती जन्माला घातली· यामुळे या धरणाचा प्रयोग महाराष्ट्रात नव्हे तर देशातही अनेक ठिकाणी नावाजला गेला· बळीराजासारखी छोटी धरणे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात देशात अस्तित्वात होती· परंतु मिश्र शेती, समान पाणी वाटप अशासारख्या अनेक भूमिका बळीराजाने सप्रयोग राबविल्या· बळीराजाचा प्रयोग केवळ एका धरणासाठीचा लढा नाही·· बळीराजा हे एक धरण नसून ते एक धोरण आहे· बळीराजाचा आराखडा, उद्देश, बळीराजाचे तत्वज्ञान व भूमिका यांचे महत्त्व इतर धरणापेक्षा कसे वेगळ्या प्रकारचे आहे· तसेच कष्टकरी जनता अशा प्रकारचे धरण बांधून स्वावलंबी व स्वयंपूर्ण होऊ शकते हे बळीराजाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी सदरचा विषय निवडला आहे·

1·3 <u>विषय निवड उद्देश</u> :-

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये सांगली जिल्हयाच्या खानापूर तालुक्यातील बलवडी-तांदुळवाडी सारख्या ग्रामीण भागात उदयाला येऊ पाहत असलेल्या "बळीराजा स्मृती धरण" आणि त्या निमित्ताने आकार घेत असलेल्या "पर्यायी विकासनीतीचा" या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचे ठरविले· ज्या मातीत जन्माला आलो त्या मातीशी इमान राखून आपल्या मातृभूमीतील कष्टकरी जनता आपल्या हक्कासाठी रात्रंदिवस लढत आहे, पोटाची खळगी भरण्यासाठी राबराब राबते आहे त्या राबणा-यांनी स्वयंनिर्भर व स्वावलंबी होण्यासाठी शासनाच्या मदतीच्या कुबडया झिडकारून देवून स्वकर्तृत्वावर नवीन धोरण आखून प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे, तो प्रयोग इतरांना समजावा या कर्तव्यापोटी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सदरच्या विषयाची निवड केलेली आहे.

प्रबंधिकेसाठी हा विषय निवडण्याचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे हे धरण ज्या पध्दतीने आणि ज्या परिस्थितीमध्ये उभे राहिले आहे ते सर्व उद्‌बोधक आहे. समाजाच्या प्रश्नाशी बांधिलकी असणा-या शासन व राजकीय पक्षांनी या धरण निर्मितीसाठी सहकार्य तर केलेच नाही उलट काही प्रमाणात विरोधाची भूमिका स्वीकारली. परंतु मुक्ती संघर्ष चळवळ व कष्टक-यांच्या सततच्या संघर्षातून हे ग्रामीण विकासाचे जे काम पूर्ण झाले आहे ते विधायक काम समजावून घ्यावे लागेल आणि अशा प्रकारच्या कामाची बाकी समाजाला ओळख करून देणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारचे धरण होत असतानाच या लोकशक्तीच्या कार्यातून काही भविष्यकालीन अडचणी (भांडवलनिर्मिती, शासकीय कारभार, तांत्रिक, पर्यावरण समतोल, पाणीवाटप इ.) यांचाही आढावा घेण्याचे दुसरे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आज बहुतांशी भारतीय नागरिक आपल्या विकासासाठी संपूर्णपणे शासनावर अवलंबून राहिलेला आहे. परंतु या परिसरातील राबणा-या मंडळींनी स्वतःचा विकास स्वतःच करवून आणण्याचे धोरण स्वीकारले आहे. तसेच यातून जी पर्यायी विकासनीती पुढे आणलेली आहे याचाही अभ्यास करण्याचे उद्दिष्ट आहे. बळीराजा स्मृती धरण निर्मितीतील महत्त्वाचा घटक असणा-या "मुक्ती संघर्ष चळवळी"चे इतर प्रचलित राजकीय पक्ष, संघटना, गट यापेक्षा काय वेगळेपण आहे हे ही प्रामुख्याने अभ्यासण्याचा उद्देश आहे. एकंदरीत या विषय निवडीपाठीमागे खालील काही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

1. खानापूर तालुक्यातील कष्टकरी जनता प्रथम गाव व नंतर प्रदेश सुधारणेचे कार्य हाती घेतो याची कारणे तपासणे.

2. याच भागातील लोकांच्यामध्ये अशाप्रकारचे धरण बांधण्याची कल्पना उदयाला का आली याचा अभ्यास करणे.

3. बळीराजा धरण बांधण्याची गरज का निर्माण झाली याचा अभ्यास करणे.

4. बळीराजा धरणाचे तत्वज्ञान व भूमिका याचा अभ्यास करणे.

5. मुक्ती संघर्ष चळवळीचा उदय व कार्य तसेच या चळवळीचे वेगळेपण याचा अभ्यास करणे.

6· बळीराजा धरण निर्मितीची प्रक्रिया व त्यातून पुढे आणलेल्या पर्यायी विकासनीतीचा अभ्यास करणे·

## 1·4 संशोधन पध्दती व अभ्यासाची साधने :-

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये खानापूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती व त्याबाबत शासनाचे धोरण याबाबतचा अभ्यास करण्यात आलेला आहे· दुष्काळ निर्मूलनासाठी कष्टकरी जनताच स्वतः धोरण आखून त्याची प्रत्यक्षपणे सप्रयोग अंमलबजावणी करून स्वतःचा विकास स्वतःच नियोजनाव्दारे कशा प्रकारे करू शकते याचा अभ्यास करण्यात आलेला आहे· बळीराजाचा प्रयोग प्रस्थापित शासकीय यंत्रणेच्या चौकटीत बसणारा नव्हता· तरीही लोकलढयाच्या रेटयातून तो शासनाला कशाप्रकारे मान्य करावा लागला व लोकांनी बांधलेल्या धरणाला शासनाला कशा पध्दतीने व का मान्यता द्यावी लागली याचाही अभ्यास करण्यात आलेला आहे· बळीराजाने पुढे आणलेले तत्वज्ञान व भूमिका याचाही अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये प्रामुख्याने करण्यात आलेला आहे·

हा अभ्यास मुख्यतः प्राथमिक आणि दुय्यम दर्जाच्या माहितीच्या आधारे केला आहे· या प्रबंधिकेसाठी ज्या पध्दतीची आकडेवारी व माहिती आवश्यक होती तेवढी देण्यात आलेली आहे·

### 1· अभ्यासाची प्राथमिक साधने :-

प्रस्तुत प्रबंधिकेच्या अभ्यासासाठी प्राथमिक दर्जाची माहिती प्रश्नावली व मुलाखतीव्दारे संकलित करण्यात आली· त्यासाठी बळीराजा स्मृती धरणाच्या परिसरात प्रत्यक्ष जावून, विविध गटातील व्यक्तीच्या मुलाखती घेवून मिळविण्यात आली· यासाठी प्रथम या प्रदेशाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये अंतर्भूत असलेल्याविविध राजकीय, सामाजिक सेवाभावी चळवळीचा अभ्यास करण्यात आला· प्रत्यक्ष "बळीराजा" चळवळीमध्ये गुंतलेल्या विविध कार्यकर्त्यांच्याकडून व पुरोगामी विचारांच्या मंडळीकडून मुलाखतीव्दारे माहिती गोळा करण्यात आली· तसेच खानापूर पंचायत समिती, बलवडी-तांदुळवाडी ग्रामपंचायत, गावकामगार तलाठी कार्यालय, बळीराजा जलसंवर्धन व वितरण विकास संस्था बलवडी-तांदुळवाडी, शोषित शेतकरी कामगार मुक्ती संघर्ष क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ, विटा, या परिसरातील स्वातंत्र्य सैनिक व या दोन्ही गावातील ग्रामस्थ व तरूण कार्यकर्ते यांच्याशी

वेळोवेळी चर्चा करून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या धरणाच्या संदर्भात जिल्हयातील वेगवेगळ्या राजकीय नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया समजावून घेण्यासाठी त्यांच्या भेटी घेवून चर्चा केली.

2. **अभ्यासाची दुय्यम साधने :-**

प्रस्तुत प्रबंधिकेसाठी बळीराजा स्मृती धरण कार्यालयातून, अनेक प्रकारची आकडेवारी, कोष्टके, प्लॅन, इस्टिमेटस्, नकाशे, अहवाल उपलब्ध झाले. सन 1983 पासून खानापूर तालुक्यात मुक्ती संघर्ष चळवळ कार्य करू लागली. त्यातूनच सन 1984 पासून बळीराजा धरण चळवळीने जोम धरला. या चळवळीची प्रसिध्दी विविध माध्यमातून आजतागायत होत आहे. चळवळीची माहितीपत्रके, निवेदने, जाहिरनामे, आवाहने, वर्तमानपत्रे, अग्रलेख, पाक्षिके, साप्ताहिके, मासिके, चळवळीची पोस्टर्स व पुस्तिका चळवळीने आयोजित केलेले परिसंवाद व त्या संदर्भात प्रसिध्द झालेली माहितीपत्रके, चळवळीच्या संदर्भात आकाशवाणी, दूरदर्शन याव्दारे प्रसारित झालेले कार्यक्रम इ.व्दारे अनेक प्रकारची माहिती गोळा करण्यात आली. काही माहिती सांगली जिल्हा कलेक्टर कार्यालय, खानापूर पंचायत समिती, गावकामगार तलाठी कार्यालय, ग्रामपंचायती, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ इ.मधून संकलित केली. या प्रदेशाची भौगोलिक, आर्थिक, राजकीय पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यासाठी काही ग्रंथाचा अभ्यास करून आवश्यक तेवढी माहिती संकलित केली आणि त्या ग्रंथांचे संदर्भ घेऊन प्रबंधिका जास्तीत जास्त वास्तववादी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या विषयासंदर्भात काही संशोधक मंडळींनी आपले संशोधन प्रकल्प तयार केले असून त्याचाही उपयोग प्रबंधिकेसाठी माहिती मिळविण्यासाठी करण्यात आला.

वरीलप्रमाणे वेगवेगळ्याप्रकारे गोळा केलेल्या या माहितीचा तुलनात्मक अभ्यास करून साधार सुसंबध्द असे विवेचन केले आहे. प्रबंधाची मांडणी ऐतिहासिक दृष्टिकोणातून केली आहे.

## xxx संदर्भ xxx


1· पळशीकर वसंत, पाणी विशेषांक, परिसरवार्ता, वर्ष तिसरे, अंक 7 वा, मे·1988, पृ·2

2· *Desai A.R., 'Rural Indian In Transition', Popular Prakashan, Bombay, 1961, page 2.*
*Seshadri K.,'Ploitical Linkage's and Rural Development' National Publication House New Delhi, page 4*

3· *Kamat A.R., 'Essays on Social Change in India, Indian Institutions of Education, Pune, 1983, Page 10,11.*

4· काळे बाबूराव, ग्रामीण विकासातील नवे प्रवाह, लोकराज्य, मुंबई, 1 जून,1986, पृ·23, 24, 29·

5· ब्रम्हे सुलभा व उपाध्ये अशोक, "महाराष्ट्रातील समाजनिर्मिती आणि शेतक-यांचा उठाव : एक टीकात्मक विश्लेषण" शंकर ब्रम्हे, समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे,1979 पृ·80 व 81·

6· पाटील रा·तु·,"सांगली-साता-याचे राजकारण" अजय कराड, 1986, पृ·45 ते 48

7· गोखले पु·पा·, "जागृत सातारा", लोकसेवा संघ, सातारा, 1966, पृ·20 ते 55·